नि.फौ.ख.क्र.१९/२०१८
सरकार-वि- मिना व इतर
नि.क.१४

**<u>सरकार पक्षा तर्फे साक्षीदार क.१ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक कथन करतो/करते की,

माझे नाव : केशव भाउराव रामटेके
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : शिक्षक
राहणार : आंबोली, तह. उमरेड, जि. नागपूर

**<u>सर तपास सरकारी अभियोक्ता श्री. मरसकोल्हे यांचे मार्फत :-</u>**

मी आरोपीला ओळखत नाही. मी नगरपरिषद स्वर्गीय गोवर्धनसिंह भदोरीया, बुधवारी प्राथमीक शाळा, उमरेड येथे शिक्षक आहे. माझे शाळेमध्ये त्या दिवशी पोलीस आले होते. त्यावेळी मुख्याध्यापक अरूण वाघमारे हे हजर होते. पोलीसांनी माझेसमक्ष पंचनामा केला नाही. मुख्याध्यापक व पोलीसांमध्ये काय बोलणे झाले ते मला माहित नाही. आता मला दि.७.१२.१७ रोजीचा जप्ती पंचनामा दाखविला. यावर माझी सही आहे. मात्र त्यातील मजकुर मला माहित नाही. त्या पंचनामाला नि.१५ देण्यात येते.

**<u>सरकारी वकीलांनी साक्षदार सहकार्य करीत नाही असे मांडले, उलट तपासातील प्रश्न विचारण्याकरिता परवानगी देण्यात येत आहे</u> :-**

याबाबत मला माहित नाही कि, ७.१२.१७ रोजी १३:०० वाजताचे दरम्यान पोलीस शाळेमध्ये आले होते व काही दस्त हस्तगत केले होते. हे म्हणणे खरे नाही कि, पोलीसांनी माझेसमक्ष जप्ती पंचनामा तयार कला, तो मला वाचून दाखविला त्यानंतर मी सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्याकरिता मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी क.१ तर्फे वकील श्री.पिंपळकर व आरोपी क.२ तर्फे वकील श्री.व्ही. एन. पाटील यांनी नाकारला:</u>-**
**फेर तपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.क.केले समक्ष

न्या.दं.प्र.श्रे.
उमरेड

(ए.व्ही. पंडित)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
उमरेड
दि : १३.०८.२०१९